# म्हैसाळ गावाची सामाजिक आर्थिक रचना

पूर्वीपासून या गावात दूधाचा धंदा चालत आल्याने गावचे नांव " म्हैशाळ " हे पडले. "म्हैशाळ " हे नाव तेथील दूधाच्या धंधापासून मिळाले असावे असे गावक-यांचे मत आहे. हे गाव सर्व सोयीने युक्त आहे. कर्नाटक सिमेलगत परंतु महाराष्ट्राचे हददीत मिरज विजापूर ह्या रस्त्यावर राज्यमार्गावर आहे. म्हैशाळ गावा लगत कृष्णा नदी वाहते. त्यामुळे येथील जमिन सुपिक काळी कसदार आहे त्यामुळे शेती हा मुख्य व्यवसाय चालतो. शेती उत्पादन मोठ्या प्रमाणात होत असल्याने धान्याची आवक जवळ होते. गावाची लोकसंख्या जवळजवळ १0000 च्या वर आहे सर्व जातीचे लोक गावात राहतात. विशेष करून प्रमुख हिंदू धर्मातील जाती जमातीचे लोक मोठ्या प्रमाणात वास्तव करून आहेत. त्यातील अनुसूचित जाती जमातीची लोकसंख्या एकूण लोक संख्येच्या पंधरा टक्के आहे. यावरून म्हैशाळ येथे दलीतांची लोकसंख्या बरीच आहे असे आढळून येते.

म्हैशाळ गावात फार पूर्वीपासून बलुतेदार पध्दती अस्तित्वात होती. त्यानुसार गावात निरनिराळ्या व्यवसाय करणा-या जाती राहतात. जाती व त्यांची कुटूंबे यांची माहिती खालीलप्रमाणे.

| निरनिराळ्या जाती | एकूण कुटूंबे |
|---|---|
| मराठा | ३५0 |
| जैन | २00 |
| ब्राम्हण | ३0 |
| लिंगायत [ वाणी ] | २५ |
| कोळी | २0 |

| | |
|---|---|
| शिकलगार | १५ |
| सुतार | १५ |
| लिंगायत [ माळी ] | ३० |
| परिट | १० |
| सोनार | ७ |
| लोहार | १२ |
| मुसलमान | ८५ |
| न्हावी | २५ |
| बागडी | २० |
| महार | १३५ |
| मातंग | ४५ |
| चांभार | ७० |
| धनगर | ६० |
| वडार | १५ |
| कैकाडी | २० |
| रामोशी | ५ |
| एकूण | ११५९ कूटूंबे |

म्हैशाळ स्टेशन वस्तीवर राहणाऱ्या जाती व कुटूंबे निरनिराळ्या

| निरनिराळ्या जाती | एकूण कुटूंबे |
| --- | --- |
| गोसावी | २० |
| रामोशी | १० |
| महार | ११ |
| मराठा | ५ |
| चांभार | ५ |
| मातंग | ५ |
| लिंगायत | १० |
| इतर लिंगायत | ७ |
| एकूण | ७३ कुटूंबे |

वरील निरनिराळ्या जाती व त्यांची राहणारी कुटूंबे ही आकडेवारी वसंतराव देशपांडे यांच्या पुस्तकातील तक्ता क्र. ३.१ व ३.२ या आधारे व गावातील पंचायतीच्या नोंदीच्या आधारे काढलेली आहे. वरील जाती व त्यांची कुटूंबे ढोबळ मानाने आकडेवारी वरून गावात राहणाऱ्या जाती व त्यांची कुटूंबे तसेच निरनिराळे पारंपारिक व्यवसाय यांची माहिती मिळू शकते. तसेच जातवार वर्गवारी करण्यास उपयुक्त आहे. यावरून म्हैशाळ गावातील जाती व त्यांच्या व्यवसायावरून पारंपारिक बलुतेदार पध्दती अस्तित्वात होती तसेच त्यांचे व्यवसाय रूढी परंपरा अजुनही अस्तित्वात आहेत.

UNIVERSITY ... KOLHAPUR

वरील निरनिराळ्या जाती व त्यांची एकूण कुटूंबे १२३२ असून सर्व मिळून एकूण लोकसंख्या 10000 च्या वर आहे. यावरून म्हैशाळ गावाचे वैशिष्ठ लक्षात येतात की सर्व महत्वाच्या जातीतील लोक वास्तव करीत असून प्रत्येक जातीतील कुटूंबांची लोकसंख्या ब-यापैकी आहे. अस्पृश्य समजल्या जाणा-या जातीतील कुटूंबांची लोकसंख्या ही मोठ्या प्रमाणात आहे. अनुसूचित जातीची लोकसंख्या पंधरा टक्के आहे. पूर्वीच्या जमान्याप्रमाणे जातीनुसार लोकवस्त्या करत आजही कांही प्रमाणात जातीनुसार वस्त्या दिसतात. परंतु एकाच ठिकाणी एका जातीची सर्व कुटूंबे वस्ती करून आहेत. असे नाही मराठा लिंगायत या जातीतील कुटूंबे अधिक प्रमाणात विखुरलेली आहेत. अस्पृश्य समजल्या जाणा-या जातीमधील महार, मातंग इत्यादी जातीनी आप-आपल्या वस्त्या एकत्रीत करून वास्तव करीत आहेत असे दिसते. जाती रचनेवर आधारित समाज व्यवस्था असल्याने अस्पृश्यांना गाव कुसाच्या बाहेर स्थान दिल्यामुळे ह्या जाती एकत्रित जातवार वस्त्या करून आहेत.

गावामध्ये हिंदू धर्मातील प्रमुख जाती राहत असल्यामुळे हिंदू धर्मातील चाली, रूढी, परंपरा, धार्मिक विधी पाळल्याचे दिसते. निर-निराळ्या दैवतांची देवळे म्हैशाळ गावात दिसतात. परंपरावादी दृष्टी-कोनातून गावात निरनिराळ्या धार्मिक उत्सव साजरे केले जातात. जातीवर्ण व्यवस्थेमुळे गावात फार पूर्वीपासून स्पृश-अस्पृश्य इत्यादी पाळल्याचे तसेच उच्च निचतेचा भेदभाव असलेला दिसतो. जाती रचनेमुळे पारंपारिक व्यवसायावर आधारित बारा बलुतेदार पध्दती अस्तित्वात होती हे दिसते. उदा. लोहार, सुतार, चांभार, सोनार, कोष्टी, शिंपी न्हावी, कुंभार इत्यादी जातीतील लोक पारंपारिक वडिलोपार्जित धंदा करताना दिसतात.

त्यामुळे गावातील सवर्णांनी अस्पृश्यता मोठ्या प्रमाणात पाळल्याचे आजही जाणवते. पूर्वी सार्वजनिक पाणवठे सार्वजनिक उपहारगृहे, विहीरी, देवळे इत्यादी ठिकाणी अस्पृश्यांना प्रवेश नव्हता. मंदीर प्रवेशास बंदी, हॉटेलमध्ये चहा पिण्यासाठी वेगळी साधने शाळेत अस्पृश्यांची मुले बाहेर बसवत असे. लग्न समारंभाच्यावेळी अस्पृश्यांना शिळे अन्न दिले जात तसेच वेगळ्या पंगती बसवत.

गावात विशेष करून जैन, ब्राम्हण, लिंगायत, इत्यादी सर्वच जातींनी अस्पृश्यता मोठ्या प्रमाणात पाळली होती. आजही वृध्द महिला व पुरुष सनातनी वृत्तीचे असल्याने अस्पृश्यतेसंबंधी परिवर्तनवादी दृष्टीकोन स्विकारण्यास तयार नाहीत. त्यामुळे अस्पृश्यता विषयी मनातील द्विधा अवस्था तरुणांची होताना दिसते. गावातील समाज व्यवस्था सरंजामी पध्दतीची होती. त्यामुळे अस्पृश्यांना याच समाज व्यवस्थेत जीवन कंठावे लागत असे. अस्पृश्यांना आजपर्यंत सामाजिक न्यायापासून अलिप्त ठेवले आहे. अस्पृश्यांना पूर्वी शिक्षणाची दरवाजे बंद होती. त्यामुळे जाणीव जागृती झाली नाही. त्याचा परिणाम म्हणजे अज्ञानपणा, दारिद्र्य, लाचारी व अनिष्ठ रूढी घर करून राहिल्याचे दिसतात.

" देवदासी " ही अनिष्ठ प्रथा गावातील अस्पृश्य जातींनी पाळल्याचे दिसते. अस्पृश्य जातीतील मुली देवाला सोडीत. त्या मुलीचे लग्न देवाबरोबर लावीत, देवाच्या नावानेच मंगळसूत्र बांधीत त्यामुळे गावातील अनेक देवदासींचा सवर्णांच्याशी संबंध येत असल्यामुळे त्यांना मुले होत ती मुली देवदासींची मुले म्हणून लोक हिणवत असत.

एकंदर वरील सर्व विवेचन पाहता असे दिसते की अस्पृश्यांना गावात सामाजिक प्रतिष्ठा नव्हती तसेच सामाजिक क्षेत्रात तुच्छतेची वागणूक मिळे.

सरंजामी समाज व्यवस्थेतून अस्पृश्यांना वगळले गेले. त्यांना बहिष्कृत केले होते.

म्हैशाळ गावाची लोकसंख्या मोठी असल्याने गावातील आर्थिक स्थिती चांगली असल्याने पूर्वीपासून शिक्षणाच्या सोयी उपलब्ध आहेत. शैक्षणिक संस्था खाजगी, सहकारी कार्यरत आहेत. गावात दोन प्राथमिक शाळा तसेच माध्यमिक शाळा एक तसेच इंग्रजी शिक्षण देणारी एक प्राथमिक शाळा आहे. सर्व शैक्षणिक संस्थामध्ये म्हैशाळमधील एकूण दोन हजार विद्यार्थी शिक्षण सध्या घेत आहेत. गावात एक सरकारी दवाखाना व एक प्रसुती गृह आहे. गावात खाजगी वैद्यकीय व्यवसाय करणारी सात दवाखाने आहेत. तेथे रोग्यांना प्राथमिक उपचार केले जातात. इतर चार निरनिराळ्या बँकांच्या शाखा आहेत. त्यामध्ये गावातील लोकांच्या पैशाची देवाण - घेवाण ठेवी, बचत इत्यादी कार्य चालते. ग्रामपंचायतीमार्फत गावातील आरोग्याची स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची लाईटची, सोई केल्या जातात पिण्याच्या पाण्यासाठी १९७४ साली नळ योजना झाली. त्यापासून आज गावाला स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जातो.

म्हैशाळ येथे लागवडी खाली एकूण ३२४० हेक्टर जमिन आहे. त्यापैकी आज २८४० हेक्टर जमिनीला पाणी पुरवठा होतो. म्हणजे बागायती जमिनीचे एकूण जमिनीशी प्रमाण सुमारे अठ्ठ्यांऐंशी टक्के पडते. नदीच्या पाण्याचा वापर जमिनीला होत असल्याने जमिनीतून नगदी पिके मोठ्या प्रमाणात घेतली जातात. उदा. ऊस. द्राक्ष, पानमळा, गहू, ज्वारी कापूस, तंबाखू इत्यादी गावातील एकूण जमिनीपैकी जवळ जवळ चाळीस टक्के जमिनीत ऊस, द्राक्षे ही पिके घेतली जातात. बाकीच्या साठ टक्के जमिनीतून पानमळा

कापूस, तंबाखू, गहू, ज्वारी इत्यादी पिके घेतली जातात. एकूण पिका-मध्ये ऊस व द्राक्षे या पिकांची टक्केवारी जास्त आहे. तसेच या नगदी पिकापासून एकरी उत्पादन चांगले मिळते. उदा. ~~इमरतू~~ ऊसापासून एकरी दहा हजार रुपयापर्यन्त उत्पन्न मिळते. तसेच द्राक्षापासून एकरी वीस हजाराचे उत्पन्न मिळते.

म्हैशाळ गावातील शेतक-यांनी आपल्या जमिनीमध्ये ऊस, द्राक्षे, यांची लागवड मोठ्या प्रमाणात केल्याचे दिसून येते. तसेच पानमळा, कापूस, तंबाखू इत्यादी पिके ही घेतली जातात.

गावात एकूण सात पाणी पुरवठा योजना आहेत. त्यापैकी कांही सहकारी पाणी पुरवठा मार्फत शेतीला पाणी पुरवठा केला जातो. काही योजना शेतकरी सहकारी साखर कारखान्याद्वारे चालवल्या जातात. एकंदर पाहता सर्व जमिनीपैकी ८०% टक्के जमिनीला पाणी पुरवठा केला जातो. त्यामुळे बागायती क्षेत्र मोठ्या प्रमाणात आहे. वेगवेगळ्या योजनामार्फत जवळ जवळ ८०% टक्के जमिन ओलीताखाली आहे.

शेती व्यवसाया खालोखाल दूध व्यवसाय मोठ्या प्रमाणात चालतो. फार पूर्वीपासून या गावात दूधाचा व्यवसाय चालतो. आज गावामध्ये १५०० म्हैसी २०० संकरित १०० देशी गाई आहेत. शेळ्या मेंढ्या १००० चे वर आहेत. एकंदर सर्व जनावरापासून गावात चार दूध संस्थमार्फत जवळजवळ पाच हजार लिटर दूध गोळा केले जाते. यावरुन गावात दूध व्यवसाय सर्व जाती करताना दिसतात. सरासरी प्रत्येक कुटूंबाजवळ एखादे तरी दुभते जनावर दिसते. अनुसूचित जाती जमाती लोकाकडून एकूण दुभत्या जनावरापासून ८०० लिटर दूध गोळा केले जाते दूध सहकारी सोसायट्यामार्फत गोळा केले जाते. ते दूध विक्रीसाठी बाहेर पाठवले जाते.

एकंदर शेती व्यवसाय व दूध व्यवसाय हे येथील मुख्य व्यवसाय आहेत. पाणी पुरवठ्याच्या सोयीमुळे तसेच शेतीत उत्पादन चांगले निघते तसेच जनावरांना वैरण मोठ्या प्रमाणात उपलब्ध होते. त्यामुळे दुग्ध व्यवसायास अनुकुल वातावरण आहे. त्यामुळे दूध व्यवसायाचा विकास झाला आहे. आज शेती विकासामुळे रोजगार मोठ्या प्रमाणावर उपलब्ध झाला आहे. त्यामुळे बेकारी कमी होण्यास मदत झाली आहे. म्हैशाळ गावातील अस्पृश्यांना मजुरीसाठी " रयतेवर " अवलंबून रहावे लागे, तसेच रयताच्या घरची झाडलोट करणे, लाकुड फोडणे झाडाना पाणी घालणे, इत्यादी कामे करावी लागत, तसेच अस्पृश्यांना सरकारी कामेसुध्दा करावी लागत. त्यामध्ये गावाची राखण करणे, दवंडी देणे, गावची कागदपत्रे घेऊन तालुक्याला जाणे, चावडी साफ करणे इत्यादी कामे करावी लागत.

गावात पूर्वी सामुली कर्ज देऊन " रयत " गडी बांधून घेत. बलुतेदार पध्दतीत अस्पृश्यांना त्यांचा कामाचा मोबदला म्हणून वर्षाकाठी धान्य देत असत या तुटपुंज्या धान्यावर अस्पृश्यांना चरितार्थ चालविणे कठिण जात असे प्रत्येक " रयताची " महार कुटूंबे होती त्याना रयताची सर्व कामे करावी लागत त्यांची मेलेली जनावरे ओढून टाकणे लग्न समारंभात मांडव साफ करणे, घरचा ओटा झाडणे, बत्त्या धरणे, मयताची खबर, लाकडे फोडणे, इत्यादी सर्व कामे या कुटूंबाना करावी लागत व या कामाचा मोबदला म्हणून वर्षाकाठी कांही धान्य मिळे. " रयताला " वीस पोती धान्य आले तर त्यातील चार पोती महार कुटूंबाला मिळत त्यातील दोन पोती चांगलो व दोन पोती गोंड असलेले धान्य मिळे.

गावातील बहूसंख्य अस्पृश्य हे शेतमजूर होते. कांहीची जमिन ही सावकाराने गहाण घेतल्यामुळे भूमिहीन झाले कांहीनी आर्थिक अडचणीमुळे

जमिनी अगदी कमी किंमतीत विकून टाकल्या व ते शेतमजूर बनले. पूर्वी पासून अस्पृश्यांना शेतीवरच गुजरान करावी लागे त्यांना शेतमजूर केल्याशिवाय दुसरा मार्ग नव्हता. पूर्वी गावात शेतमजूरी करणा-या अस्पृश्यांना अत्यंत कमी मजूरी मिळे. कांही अस्पृश्यांचे उपजिविकेचे साधन गावकीची कामे आणि भिक मागणे हे होते. गरीबी, दारू, रोगराई, इत्यादी स्थिती आपल्या दारिद्र्यामुळे निर्माण होते व आर्थिक परिस्थितीला आपणच जबाबदार आहोत, अशी कल्पना अस्पृश्य करीत असत व त्यामुळे गावातील सवर्णांबद्दल मोठ्या जमिनदार, सावकारीबद्दल आदरायीच भावना नेहमी अस्पृश्य दाखवित असत. आणि त्यांची समजूत अशी होती की " रयत " आपल्याला अन्न, धान्य, तसेच जुनी कपडे इत्यादी वस्तु देतात हे काय कमी आहे " परंतु अस्पृश्यांना दाता याचक संबंधातून वेगळा विचार करणे त्यांना अशक्य होते. या अस्पृश्यांना आर्थिक परिस्थिती सुधारण्यास त्यांना कांही उद्योग देणे व गावातील रयतेवरचे अवलंबित्व नष्ट करणे या साठी कांहीतरी उपाय सुचविणे तसेच त्यांना मदत करण्यासाठी देवलांनी दूध सोसायटी गावात सुरु केली. अस्पृश्यांना सोसायटीच्या सहाय्याने म्हैशी कर्जरूपाने मिळू लागल्या आणि अस्पृश्य हळू हळू दूधाचा व्यवसायाकडे वळू लागले.

सारांश रूपाने सांगावयाचे झाल्यास महाराष्ट्राच्या इतर खेड्यातील अस्पृश्यांच्या मागासलेल्या सामाजिक आर्थिक परिस्थितीत फारसा फरक नव्हता असे आपणास वरील विवेचनावरून स्पष्ट दिसते.

म्हैसाळ गावातील अस्पृश्यांचा सामाजिक आर्थिक दर्जा हिन असल्याचे दिसते. तेथील सरंजामी पध्दतीची समाज व्यवस्था तसेच वर्ण व्यवस्था असल्याने अस्पृश्यांना विकासाची संधी मिळू शकली नाही. -

अस्पृश्यांना स्वाभिमान शुन्यता, लाचारी, गरीबी, इत्यादी सामाजिक अन्यायाला तोंड द्यावे लागत असे म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जी धर्मांतराची चळवळ महाराष्ट्रात उभी केली त्याचा अजिबात म्हैशाळच्या अस्पृश्यांवर परिणाम झालेला नाही. धर्मांतरामुळे महाराष्ट्र इतर गावातील अस्पृश्यांमध्ये जागृती व एक नवीन अस्मीता झाली तशी अस्मिता म्हैशाळच्या अस्पृश्यतामध्ये निर्माण होऊ शकली नाही त्याच प्रमाणे त्यांच्या मागासलेल्या परिवर्तनासाठी आवश्यक असलेला बाहेरील दलीत पुढारीपणाचा हस्तक्षेप सुध्दा शक्य झाला नाही.

वरील विवेचनावरून आणखी एक गोष्ट स्पष्ट होते, ती म्हणजे विठ्ठल सहकारी शेती सोसायटी स्थापनेपूर्वी दलीतांची आर्थिक परिस्थिती अतिशय वाईट होती. सरंजामी पध्दतीत दलीतांना वेठबिगारीच्या व बलुतेदारीच्या मोबदल्यात मिळणारी मिळकत एवढी तुटपुंजी होती की, यामुळे अस्पृश्यांचे पोट भरीत नसे, त्यांची उपासमार होत असे त्यांना वेठ-बिगारी व बलुतेदारी शिवाय उपजिविकेचे जे " महार " वतन" जमीनीचे साधन होते ते विशेषत: सावकारांच्याकडे गहाण ठेवल्यामुळे अशा बिकट परिस्थितीत मार्ग काढण्यासाठी कुठल्यातरी बाहेरील हस्तक्षेपाची गरज होती, ती गरज " देवलांच्या " सहकार्याने पूर्ण झाली.